ePaper
महाराष्ट्रावर मुसळधार पावसापेक्षाही मोठं संकट; पुढील 5 दिवस धोक्याचे!
॥ वर्ष - 8 । अंक - 274 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥



महाईन्यूज™

## आतील पानांत


- भारताचा जागतिक क्रिकेटमध्ये दबदबा
- बुमराहचं उपकर्णधारपद कायमचं गेलं?
- हल्ल्यानंतर दिल्लीत हालचालींना वेग
- राजस्थानमध्ये पाकिस्तानी रेंजरला अटक


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 6 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## संयुक्त राष्ट्रांनी पाकिस्तानचे थोबाड फोडले

# कुछ बडा होनेवाला हैं!

## पंधरापैकी तेरा देश भारताच्या पाठीशी ; फक्त चीनला पुळका !

। नवी दिल्ली / श्रीनगर / इस्लामाबाद ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लष्करी अधिकाऱ्यांच्या वायुवेगाने होणाऱ्या हालचाली पाहता आता 'कुछ बडा होनेवाला हैं !' हा संदेश दूरवर पोहचला आहे. मोदींनी पुन्हा सर्व प्रमुख खात्यांच्या सचिवांची बैठक घेतली. या बैठकीला परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवालही उपस्थित होते.**




### प्रश्न संयुक्त राष्ट्रांमध्ये..

रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादीमीर पुतीन यांनी नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली आणि युद्ध झाल्यास भारताला पूर्णपणे पाठिंबा देत आहोत, असे स्पष्ट सांगितले. पाकिस्तानने भारताच्या विरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. पण, तेथे उपस्थित असणाऱ्या पंधरापैकी तेरा राष्ट्रांनी भारताला पाठिंबा दर्शविला. फक्त चीन आणि पाकिस्तान ही दोनच मते पडल्यामुळे पाकिस्तानचे तेथे थोबाड फुटले.

### महाशक्तीचा भारताला पाठिंबा

दरम्यान, १९७१ सालच्या युद्धातही रशिया भारताच्या बाजूने ठामपणे उभा राहिला होता. आता पुन्हा एकदा रशिया भारताच्या बाजूने आल्यामुळे पाकिस्तानला हा मोठा हादरा समजला जात आहे. पाकिस्तानने रशियाला मदतीसाठी आवाहन केले होते. पण, रशियाने पाकिस्ताचे आवाहन झिडकारत भारताला पाठिंबा दिला आहे. युद्धजन्य परिस्थितीत रशियाचा भारताला पाठिंबा असणे, हे एकाप्रकारे भारताचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठा विजय असल्याचे मानले जात आहे.

### पाकमधील दोन प्रांत भारताच्या पाठीशी..

पाकिस्तानमध्येही बैठकांचे सत्र सुरू असून भारताने हल्ला केल्यास कसे तोंड द्यायचे ? याचा लेखाजोखा घेतला जात आहे. त्यांच्या संसदेच्या विशेष अधिवेशनात तर अतिशय भीतीचे सावट देशावर आहे, हे स्पष्ट झाले. पाकिस्तानातील सर्वात मोठा भाग असलेल्या बलुचिस्तान तसेच पश्तुनी या दोन प्रांतांनी उघडपणे भारताला पाठिंबा दिला आहे. भारताने पाकिस्तानवर हल्ला करून आम्हाला त्यांच्या जोखडातून सोडवावे, अशी याचना त्यांनी केली आहे.

### पाकिस्तानमध्ये मोठी फूट

भारताने पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आहेत. सिंधू नदी जलवाटप कराराला स्थगिती देण्यात आल्यामुळे पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे. पाकिस्तानी नेत्यांकडून युद्धाच्या पोकळ धमक्या दिल्या जात आहेत. आता, मात्र युद्धापूर्वीच मोठी बातमी समोर येत आहे. पाकिस्तानमध्ये अंतर्गत फूट पडल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानातील खैबर पख्तनख्वामधील इस्लामिक धर्मोपदेशकाने मोठे वक्तव्य केले आहे. जर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला, तर आम्ही पश्तून लोक भारतासोबत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पश्तून लोक पाक सैन्याविरूद्ध भारतीय सैन्याला साथ देतील, असे या धर्मोपदेशकाने म्हटले आहे.

### जनतेचा ओढा भारताकडे..

दुसरीकडे, इस्लामाबादच्या लाल मशिदीमधील एका मौलानाने देखील असेच वक्तव्य केले आहे. पाकमध्ये जितका मुस्लिमांचा छळ होतो, तितका भारतात होत नाही. भारतासोबत युद्ध लढायला कोण कोण जाणार? असा सवाल या मौलानाने मशिदीमध्ये केला होता, तर तेथे उपस्थित असलेल्या एकानेही हात वर केला नाही.

### दहशतवाद्यांच्या या म्होरक्यांचं आता काही खरं नाही..!

भारतीय सुरक्षा संस्थांकडून सक्रिय दहशतवाद्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. 'लष्कर-ए-तोएबा' आणि 'जैश-ए-महम्मद' शी संबंधित दहशतवाद्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. सीमेपलीकडून काम करणारे हँडलर्स, लॉन्चिंग, कमांडरचीही जाहीर करण्यात आलेल्या यादीमध्ये नावे आहेत. दहशतवादी हल्ले घडवणारा मुख्य मोरक्या हाफिज महम्मद सईद ; २६/११ हल्ल्यासह अनेक हल्ल्यांमध्ये सहभाग असलेला झाकी उर रहमान लखवी : लष्कर-ए-तोएबाचा ऑपरेशनल कमांडर ; आंतरराष्ट्रीय कारवाया आणि भरतीचे काम साजिद मीर उल सैफुल्लाह साजिद जट्ट करतो ; महम्मद याह्या मुजाहिद – लष्कर ए तोएबाच्या मीडिया विभागाचा प्रमुख असून प्रचार आणि सार्वजनिक संदेशवहनाचे काम करतो ; हाजी मुहम्मद अशरफ : जमात उद दावा आणि इतर आघाड्यांद्वारे निधी संकलन आणि आर्थिक रसद पुरवण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे.

# हिंजवडीतील वाहतूक कोंडीत भर पडणार

## खासदार सुप्रिया सुळे यांची आयुक्त म्हसे यांच्यासोबत बैठक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) विकास आराखडा (डीपी) कशामुळे रद्द केला आहे, याचे उत्तर प्रशासनाने दिले नाही. नेमका विकास आराखडा रद्द का केला, याचे वास्तव सरकारने पारदर्शकपणे जनतेला सांगावे. आराखडा रद्द केल्याने माहिती व तंत्रज्ञाननगरी हिंजवडीतील रस्ते रखडले आहेत. रस्त्याची कामे पुढे जाणार आहेत.**



अशी भीती खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. पीएमआरडीए आणि पुणे महापालिकेने एकत्रितपणे रस्त्यांची कामे करुन नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा देण्याची मागणीही त्यांनी केली.बारामती लोकसभा मतदारसंघातील विकासकामांबाबत खासदार सुळे यांनी सोमवारी पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे यांच्यासोबत आकुर्डीत बैठक घेतली. बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सुळे म्हणाल्या, 'पीएमआरडीएचा हवेली तालुक्यात वर्तुळाकार मार्ग (रिंगरोड) जात आहे. रिंगरोडला विरोध नाही. विकास झालाच पाहिजे. त्यासाठी सहकार्य केले जाईल. पण, या रस्त्यात अनेक लोकांची घरे जात आहेत. या लोकांनी कर्ज काढून घरे उभारली आहेत. ही घरे वाचविण्यासाठी २०० मीटरची संरेखन (अलाइन्मेंट) बदलावी.'भोर तालुक्यातील श्री क्षेत्र बनेश्वर येथील बनेश्वर फाटा ते वनविभाग कमान या देवस्थानाकडे जाणाऱ्या सहाशे मीटरच्या रस्त्याला विलंब झाला आहे. त्याला तांत्रिक अडचणी असल्याचे प्रशासन सांगत आहे. काम सुरू करण्यासाठी २० मे पर्यंत प्रशासनाने मुदत मागितली आहे. २३ तारखेला काम सुरू झाले नाही. तर, आम्ही सर्वजण तिथे फावडे घेऊन जात रोजगार हमी योजनेप्रमाणे स्थानिक नागरिकांसह रस्त्याचे काम करणार आहोत. या कामाचे सरकारकडून कामाचे पैसे घेतले जाणार नाहीत.महाराष्ट्रासमोर मोठी आव्हाने आहेत. राज्याची आर्थिक स्थिती अतिशय खराब आहे. शेतकऱ्यांचा मालाला हमीभाव मिळत नाही. सरसकट कर्जमाफी केली जात नाही. गुन्हेगारी वाढत आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती खराब आहे', याकडेही सुळे यांनी लक्ष वेधले.भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या काँग्रेसला फोडा या विधानवर बोलताना खासदार सुळे म्हणाल्या,'सशक्त लोकशाहीमध्ये प्रत्येकाला कोणत्याही पक्षात जाण्याचा अधिकार आहे. परंतु, यंत्रणांचा धाक दाखविला जातो. त्यातून पक्षांतरे घडविली जातात. याला लोकशाही म्हणत नाहीत.' मुख्यमंत्रिपदाचा योग जुळून आला नाही.

### प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाल्यानंतर याबाबत भाजपकडून एकाचेही विधान समोर आले नाही. सशक्त लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे, असेही खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या.अशी भीती खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. पीएमआरडीए आणि पुणे महापालिकेने एकत्रितपणे रस्त्यांची कामे करुन नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा देण्याची मागणीही त्यांनी केली. बारामती लोकसभा मतदारसंघातील विकासकामांबाबत खासदार सुळे यांनी सोमवारी पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे यांच्यासोबत आकुर्डीत बैठक घेतली. बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

# मुलीचा प्रेमविवाह वडिलांना वाटला अपमान

## फुलणाऱ्या नात्याचा हळद समारंभात रक्तरंजित शेवट झाला?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तृप्ती आता या जगात नाही हे अविनाशला सांगू नकोस" हे वाक्य आहे अविनाश वाघ या २२ वर्षीय तरुणाच्या आईचं म्हणजेच प्रियांका वाघ यांचं, त्या ससून रुग्णालयात कुणाच्या तरी कानात हे पुटपुटल्या. अविनाशच्या खांद्यात आणि पोटात शिरलेल्या गोळ्या काढण्यासाठी त्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. शुद्धीवर आल्यावर त्याने त्याच्या पत्नीबाबत तृप्तीबाबत लगेच विचारलं तेव्हा ती धुळ्याला आईकडे गेली आहे आणि लवकरच भेटायला येणार आहे असं सांगण्यात आलं.**



पुण्यापासून साधारण ४५० किमी अंतरावर असलेल्या जळगावमधल्या चोपडा या ठिकाणी अविनाशची बहीण संस्कृतीचा हळद समारंभ होता. या कार्यक्रमात एका गाण्यावर वाघ कुटुंबीय नाचत होते. तेव्हा अचानक तृप्तीचे वडील किरण मंगळे बंदुक घेऊन कार्यक्रमात आले. त्यांनी हळद समारंभातच गोळीबार केला. ज्यामुळे तृप्तीच्या छातीत गोळी लागली तर अविनाश तिला वाचवण्यासाठी धावला असता त्याच्या खांद्यावर आणि पोटात गोळ्या लागल्या. तृप्ती जागीच कोसळली आणि तिचा मृत्यू झाला अशी माहिती प्रियांका वाघ यांनी दिली.

अविनाशची आई प्रियांका यांनी सांगितल्याप्रमाणे तृप्ती चार महिन्यांची गरोदर होती. पण तिचा मृत्यू झाल्याने २७ एप्रिलच्या दिवशी तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आत्ताची स्थिती अशी आहे की प्रियांका वाघ या मुलाजवळ उशापायथ्याशी बसून असतात. तृप्तीच्या आईने तिला नाकारलं, वडिलांनी तर गोळीच झाडली. किरण मंगळेंच्या मनाविरुद्ध तृप्तीने लग्न केल्याने ही सगळी घटना घडली.संस्कृतीच्या हळदीच्या कार्यक्रमात तृप्तीचे वडील किरण मंगळे आले आणि त्यांनी गोळीबार केला. ज्यानंतर काही मिनिटांत पोलीस घटनास्थळी पोहचले. तृप्तीचे वडील केंद्रीय राखीव पोलीस दलात (CRPF) होते. त्यामुळे त्यांच्याकडे परवाना असलेली बंदुक होती. त्यातूनच त्यांनी गोळीबार केला. किरण मंगळे यांना तिथे लोकांनी मारहाण सुरु केली. त्यामुळे किरण मंगळेही जखमी झाले. ज्यानंतर अविनाश आणि किरण या दोघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तृप्तीच्या वडिलांवर जळगावात उपचार सुरु आहेत. या प्रकरणाचा तपास करणारे पोलीस अधिकारी जितेंद्र वालटे यांनी सांगितलं की आम्ही किरण मंगळेंना तृप्तीची हत्या केल्याप्रकरणी आणि अविनाशच्या हत्येचा प्रयत्न केल्या प्रकरणी ती कलमं लावून गुन्हा नोंद केला आहे. या प्रकरणी आम्ही किरण मंगळेंचा मुलगा निखिल याचाही शोध आम्ही घेत आहोत.हे.वाघ आणि मंगळे ही दोन्ही कुटुंब अनुसुचित जातीची असल्याने जातीय किंवा धार्मिक मतभेदांमुळे हे हत्येचं प्रकरण घडलेलं नाही असं पोलिसांचं म्हणणं आहे.

### तृप्तीला शिकून डॉक्टर व्हायचं होतं

शिक्षणातली तफावत आणि आर्थिक स्तरात असलेला फरक यावरुन हे घडलं आहे. मंगळे कुटुंबाकडे जमीन आणि मालमत्ता आहे. तृप्तीला शिकून डॉक्टर व्हायचं होतं. तर प्रियांका वाघ यांनी मुलगा अविनाशला त्यांच्या पतीच्या निधनानंतर एकटीने सांभाळलं आहे. एका बहुराष्ट्रीय कंपनीच्या कार्यालयात तो स्वच्छता कर्मचारी म्हणून काम करतो.

## स्थानिकांकडून कागदपत्रांची होळी

# “टीपी स्कीम”वरून नागरिक आक्रमक!

### कुदळवाडी, चिखली परिसरातील ग्रामस्थ तीव्र आंदोलनाच्या भूमिकेत

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी चिंचवड शहरातील कुदळवाडीमध्ये दोन महिन्यांपूर्वी अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे 825 एकर जमिनीवर बुलडोझर फिरवण्यात आला. प्रदूषणाच्या आणि सुरक्षिततेच्या मुद्द्यावर ही कारवाई झाली असल्याचे सांगण्यात आले आणि त्यानंतर लगेचच महापालिकेने टीपी स्कीम (शहर विकास आराखडा) राबवण्याच्या हालचाली सुरू केल्या. याबाबतचे जाहीर प्रकटनही देण्यात आले. मात्र याची माहिती लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थ यांना देण्यात आली नाही. ग्रामस्थांना अंधारात ठेवून नवीन शहर विकास आराखडा लादला जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी सोमवारी या टीपी स्कीमच्या जाहीर प्रकटन कागदपत्रांची होळी केली. ग्रामस्थांना विचारात न घेता टीपी लादला गेला तर आक्रमक भूमिका घेतली जाईल असेही ग्रामस्थांनी यावेळेस सांगितले.**



पिंपरी चिंचवड शहरामध्ये कुदळवाडी, चिखली आणि जाधववाडी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात लघुउद्योजक व्यवसाय करत होते .त्या ठिकाणी भंगार मालाची गोदामे मोठ्या प्रमाणात होती. भंगार व्यवसायिकांमुळे शहरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. याशिवाय या भागात बांगलादेशी रोहिंगे असल्याचा संशयही वारंवार व्यक्त करण्यात आला. याबाबत ठोस कारवाई करणे गरजेचे आहे असा मुद्दा समोर आणल्यानंतर महापालिकेने अनधिकृत पत्रा शेड, गोदामे यांच्यावर कारवाई केली. कुदळवाडी, चिखलीगाव, जाधववाडी परिसरातील 825 एकर जमिनीवर बुलडोझर फिरवण्यात आला. या कारवाईनंतर येथील व्यावसायिक स्थानिक नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली. मात्र प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामनावर कारवाई केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर आता महापालिकेने नगर रचना योजनेची जाहिरात प्रसिद्ध केली आणि “टीपी” च्या हालचाली सुरू झाल्या. यामुळे नागरिकांनी देखील आक्रमक भूमिका घेत. आराखड्याला विरोध दर्शवला आहे. यासंदर्भात सोमवारी कुदळवाडी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदिरात यासंदर्भात बैठक झाली. आणि “टीपी स्कीम”ला विरोध करण्यासाठी तीव्र जनआंदोलन उभारण्याचा निर्णय करण्यात आला. बैठकीसाठी भाजपचे युवा कार्यकर्ते दिनेश यादव, जेष्ठ उद्योजक बाळासाहेब यादव, लघुउद्योग संघटनेचे माजी अध्यक्ष तात्या सपकाळ, मराठा महासंघाचे उदय पाटील यांच्यासह युवराज पवार, दिलीप यादव, रमेश मोरे, दत्तूनाना मोरे, शैलेष मोरे, बाळासाहेब हरगुडे, गुलाबराव बालघरे, कोंडिबा यादव, विशाल बालघरे, कमालकर बालघरे, मनोज मोरे, दादासाहेब मोरे, गणेश यादव, नितेश मोरे, माऊली मोरे, सुदाम पवार, विशाल नेवाळे, तानाजी बालघरे, राहुल यादव, संभाजी यादव, दीपक ठाकूर, उत्तम बालघरे, किशोर बालघरे, जितेंद्र यादव, दिलीप मोरे, बाळासाहेब मोरे आदींसह सुमारे 300 हून अधिक ग्रामस्थ उपस्थित होते.

### महापालिकेच्या जाहीर प्रकटनाची होळी

आमचा जीव गेला तरी बेहत्तर पण “टीपी” होऊ देणार नाही, अशा अत्यंत कठोर शब्दांत ग्रामस्थांनी भावना व्यक्त केल्या. महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून टीपी स्किम बाबत महापालिकेने दिलेल्या जाहीर प्रकटनाची होळी यावेळी करण्यात आली.

### ग्रामस्थांचे म्हणणे काय

चिखली कुदळवाडीच्या जमिनी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणात गेल्या. महापालिकेच्या आरक्षणातही मोठे क्षेत्र गेले आहे. स्वस्त घरकूलासाठी १०० एकर क्षेत्र घेतले. यापूर्वीच या भागातील रस्त्यांसाठी देखील जमीन संपादित करण्यात आली. उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने कुदळवाडी चिखली परिसरातच जागा शिल्लक असताना अतिक्रमणांच्या नावाखाली कुदळवाडी आणि आसपासची अनेक गावातील जमिनीवर बुलडोझर फिरवला. आणि आता नवा शहर विकासा आराखडा माती मारून पुन्हा एकदा स्थानिकांच्या जमिनी ताब्यात घेण्याच्या प्रशासनाच्या हालचाली आहे मात्र यामुळे ग्रामस्थ देशोधडीला लागतील अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. कुठल्याही परिस्थितीत हा आराखडा आमच्यावर लाजू नका. अन्यथा ग्रामस्थ तीव्र आंदोलन उभारतील असा इशारा देखील देण्यात आला आहे.

---

## कुख्यात गुंडाला विधानसभा उपाध्यक्षांनी भरवला केक!

### पालकमंत्र्यांनी समज देऊनही बनसोडे यांचा प्रताप; गुंड आक्क्या बॉण्ड वर तब्बल 16 गंभीर गुन्हे दाखल

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**विधानसभा उपाध्यक्ष पदावर असल्याने आता व्यवस्थित वागले पाहिजे या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सल्ल्याला अण्णा बनसोडे यांनी केराची टोपली दाखवल्याचे समोर आले आहे. अण्णा बनसोडे आणि कुप्रसिद्ध गुन्हेगार आकाश मोहोळ उर्फ आक्या बॉण्ड हे एकमेकांना केक भरवत असल्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल झाला आहे.**




तब्बल १६ गंभीर गुन्हे दाखल असणाऱ्या आक्क्या बॉण्ड याच्यासोबत अण्णा बनसोडे यांनी वाढदिवस साजरा केल्याने चर्चांना उधाण आले आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा ४ मे रोजी वाढदिवस साजरा झाला. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. मात्र, कुख्यात गुन्हेगार आक्या बॉण्ड हा अण्णा बनसोडे यांच्यासाठी चक्क केक आणि पुष्पगुच्छ घेऊन आला. यावेळी अण्णा बनसोडे आणि आक्या बॉण्ड यांनी एकमेकांना केक भरवत वाढदिवस साजरा केला आणि उपस्थितांच्या भुवया उंचावल्या. 'मोक्का' अंतर्गत कारागृहात असणाऱ्या आक्क्याची नुकतीच जामिनावर सुटका झाली आहे. विधानसभा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अण्णा बनसोडे यांचा नुकताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला होता. यावेळी बोलताना अजित पवार यांनी अण्णा बनसोडे यांना मोलाचा सल्ला दिला होता. विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांची मुर्ती लहान, पण किर्ती महान आहे, असे कौतुक करतानाच आता सकाळी लवकर कामाला लागा, लोकांना वेळ द्या.

### फोटो व्हायरल झाल्याने शहरभर चर्चा

जेवढे महत्वाचे पद, तेवढे जास्त कष्ट घ्यावे लागतात. तुमच्या चिरंजीवाला जरा समजावून सांगा. घरातील व्यक्तीने चुकीचे कृत्य केल्यास स्वत:ची, पक्षाची, सरकारची बदनामी होते, असा सल्ला देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बनसोडे यांचे कान टोचले होते. मात्र, अजितदादांनी दिलेल्या या मोलाच्या सल्ल्याचा अण्णा बनसोडे यांना आपल्या वाढदिवसा दिवशीच विसर पडला. वाढदिवसानिमित्त कुप्रसिद्ध गुन्हेगाराला केक भरवल्याचा त्याच्याकडून केक खाल्ल्याचा फोटो व्हायरल झाल्याने चर्चा रंगली आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### अभिमान न धरता कर्तव्यकर्म करावे

'मला कळत नाही' असे वाटणे ही परमार्थाची पहिली पायरी आहे. आपण अभिमानाने, 'मला सर्व समजते' असे मानून जगात वावरत असतो. खरोखर, अभिमानासारखा परमार्थाचा दुसरा मोठा शत्रू नाही. अभिमान हा हरळीसारखा नाश करणारा आहे असे म्हणणेसुद्धा थोडे अपुरेच पडेल; कारण हरळी वाढली तर ती दिसते, आणि म्हणून ती उपटून तरी टाकता येते; तशी अभिमानाची गोष्ट नाही. तो दिसत नाही आणि म्हणून तो केव्हा आणि कसा डोके वर काढील याचा पत्ताच लागणार नाही. चित्तशुद्धीच्या मार्गात मोठी धोंड कोणती असेल तर ती अभिमानाची आहे; आणि स्वत:च्या कर्तबगारीने आपण त्याच्या तावडीतून सुटू असे म्हणणेही वेडेपणाचे होईल. त्याच्या कचट्यातून सुटण्याचा मार्ग म्हणजे सद्गुरूला अनन्यभावे शरण जाऊन, अभिमानाच्या तावडीतून सोडविण्याबद्दल त्याची सतत प्रार्थना करणे हाच होय. चित्तशुद्धी झाली की शेताची मशागत पुरी झाली असे म्हणायला हरकत नाही. पुढे प्रश्न, बी उत्तम असणे जरूर आहे. उत्तम बी कोणते हे कदाचित् आपल्याला समजणार नाही परंतु फळ चांगले कोणते हे सहज समजते. आता असे समजा, जी फळे गोड लागली त्यांचीच लागवड केली. तरी पण पुढे असे अनुभवाला येते की, काही काळ लोटल्यानंतर कालमर्यादेप्रमाणे ते झाड मरते आणि अर्थात् फळे मिळायची बंद होतात, आणि त्यामुळे मन कष्टी होते. यावरून असे दिसते की, आता गोड लागलेली फळे ही कालांतराने दु:खालाच कारणीभूत होतात. तर मग बी निवडताना असे पाहणे जरूर आहे की, ज्याची झाडे कायम टिकणारी आहेत आणि फळे अक्षय सुखाचा लाभ देणारी आहेत. जगात उत्पन्न झालेली अशी कोणती वस्तू आहे, की जी अक्षय टिकेल ? 'कोणतीही नाही' असेच उत्तर येईल. म्हणून विनाशी फळाच्या आशेने केलेले कोणतेही कार्य सुखाला नेत नाही, असे म्हणावे लागते. याकरिताच, भगवंताशिवाय दुसऱ्या कोणत्याही फळाची आशा न ठेवता कर्तव्यकर्म करीत राहणे, हाच सुखाचा मार्ग आहे, आणि हीच उत्तम बीजाची पेरणी आहे. भगवंताची मनोभावे प्रार्थना करावी की, 'हे देवा, तुझी भक्ती तुझ्याशिवाय इतर कोणत्याही फळाच्या आशेने न होईल अशी कृपा कर.' त्या दृष्टीने आपणही प्रयत्न करणे जरूर आहे. ज्याप्रमाणे किडके आणि चांगले एकत्र झालेले धान्य आपण सुपात घालून पाखडतो आणि किडके धान्य बाहेर उडवून लावून, मागे उत्तम धान्य शिल्लक ठेवतो त्याप्रमाणे भगवंताची भक्ती करता करता, भगवत्प्राप्तीशिवाय इतर होणाऱ्या इच्छा काढून टाकण्याचा क्रम ठेवावा म्हणजे कालांतराने भगवंताकरिताच भगवत्प्राप्ती अशी भावना दृढ होत जाईल.

**बोधवचन:- खरे सुख हे कायम टिकणारे पाहिजे.**

# 'उबाठा' म्हणजे 'शोले'तील हतबल ठाकूर का जेलर ?



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



**आज ५० वर्षे झाली तरी 'शोले' चित्रपट मात्र एव्हरग्रीन ठरला आहे. चित्रपटाची कथा, त्यातील एक एक पात्र आणि त्यात अचूकपणे शोधलेली अभिनेते मंडळी..फारच छान ! सलीम-जावेद यांचे संवाद आणि अधून मधून पडद्यावर दाखवल्या गेलेल्या हेमामालिनी आणि जया भादुरी अगदी चपखल वाटतात !**

### सूडाने पेटलेला ठाकूर..

आज उबाठा गटाची अवस्था हतबलतेच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. घरातील सर्वांना एका गुंडाने ठार केल्यानंतर त्याचा बदला घेण्यासाठी सूडाने पेटलेला ठाकूर म्हणजे संजीव कुमार.. हात तुटलेले असल्यामुळे स्वतः काही करू शकत नाही, मग तो भाडोत्री गुंड नेमतो. मूळ शिवसेना फुटल्यानंतर अक्षरशः सूडाने पेटलेल्या उद्धव ठाकरे यांना मात्र असे कोणी भेटलेले नाही..जे भेटले त्यांनी आणखी गाळात घातले !

### कॉमेडियन जेलरशी तुलना..

अनेक व्यंगचित्रकार उद्धव ठाकरे यांची तुलना 'शोले' मधील कॉमेडियन जेलर म्हणजे असरानीबरोबर करतात. दरवेळी तो पायरीवरून धडपडतो.. निम्मे या दिशेने जा.. निम्मे या दिशेने जा..असे म्हणत शेवटी एकटाच राहतो ! विनोदाचा भाग सोडला, तर ठाकूर म्हणा किंवा जेलर म्हणा, दोघेही हतबल दाखवलेले आहेत.

### रोज नवीन खिंडार, उभारी कधी ?

'हम अंग्रेजोंके जमानेके जेलर है।' असे म्हणत असरानी रोज जगत असतो आणि भूतकाळातून बाहेर येत नसतो. तशी अवस्था आज उबाठा गटाची झाली आहे. निवडणुका घ्या, मग ताकद दाखवतो. खोके, बोके, गद्दार, खंजीर, वार या मर्यादित शब्दसाठ्याच्या बाहेर हा गट पडत नाही. वडील चोरले, पक्ष चोरला, चिन्ह चोरले, असे रोज रोज बोलून मते मिळत नाहीत, हे अनेकदा सिद्ध झाले आहे. तरी प्रत्येक सभेच्या वेळी असरानीप्रमाणे धडपडण्याची प्रक्रिया सुरूच आहे. त्यांच्या पक्षाला रोज खिंडार पडत आहे, आणि कार्यकर्तेसुद्धा सोडून जात आहेत. दृष्टिहीन, अकुशल नेतृत्व, वडिलांची पुण्याई आणि सभोवताली फिरणारे स्तुतीपाठक यातून सावरल्यानंतर 'आऊटगोईंग' चा प्रवाह थांबणार आहे !

### हा, गेला..जाऊ दे, तो चोरच होता !

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उबाठा गटातून बाहेर पडलेल्याची निर्भत्सना करणे, हा मूलमंत्र अंगलट आलेला आहे. गेलेला चोर होता, भ्रष्ट होता, त्याची फाईल भाजपाने काढून त्याला 'ब्लॅकमेल' केले, असा हवेत गोळीबार करत करत पक्ष संपत आला आहे, हे उद्धव ठाकरेंना कधी समजणार ? बरं जे गेले त्यांचे काहीही वाईट झाले नाही.. उलट एकनाथ शिंदे यांच्या पारड्यात जनतेने ६० आमदार टाकले, तरी शुद्ध येत नाही !

### सुषमा अंधारे सुद्धा निघाल्या...

उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या पाठोपाठ त्यांच्या गटाशी एकनिष्ठ असलेल्या सुषमा अंधारे या सुद्धा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी प्रवेश करण्यास इच्छुक असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. तथ्य किती आहे माहीत नाही, पण हे घडू शकते !

### दमानिया यांची नळावरील भांडणे..

यानंतर मजेशीर बाब म्हणजे सुषमा अंधारे आणि अंजली दमानिया या दोघींची नळावरील भांडणे सुरू झाली आहेत. पुन्हा एकदा हिंदी डायलॉग..जिनके घर शीशेके होते है, वो दुसरोंपर पत्थर फेका नहीं करते..किंवा चोर चोराच्या घरी चोरी करत नाही..कोण कोणाकडून सुपारी घेते आणि कोण किती पक्ष फिरून आले..याचा पाढा सुरू झाला आहे. चिखलात कितीही दगड टाकले, तरी चिखलच उडणार !

### सूडनाट्य उद्धव यांना झेपेल का?

संजीवकुमार बदला घेतो, उद्धव यांना विरोधकांचा संजीव कुमार पद्धतीने बदला घेण्यासाठी शक्य होणार नाही. कारण सिनेमात संजीवकुमारची चूक नसते आणि उद्धव यांची पावलोपावली झालेली चूक त्यांना यापुढे मान वर काढू देईल,असे दूरदूरपर्यंत अजिबात वाटत नाही. बहुसंख्य त्यांना सोडून गेले. आणखी काही जातील आणि शेवटी स्वतः उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे,आदित्य ठाकरे आणि एखाद वेळेस संजय राऊत हे त्या गटात शिल्लक राहतील, असे चित्र आहे.

### सुषमा अंधारे यांची भूमिका..

एकेकाळी हिंदू देवतांना, एवढेच काय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अगदी खालच्या पातळीवरील शिव्या देणाऱ्या सुषमा अंधारे यांना उद्धव ठाकरे यांनी पक्षात का घेतले, हा अनुत्तरीत प्रश्न आहे. पण, विरोधकांवर खालच्या थरावरील टीका करण्यासाठी सुषमा अंधारे आणि संजय राऊत यांचा पुरेपूर उपयोग करून घेतला जातो, हे प्रत्येकाला समजते. फक्त त्यामुळे आपलाच पक्ष गाळात चालला आहे आणि आपण पायावर दगड पाडत आहोत, हे उबाठा गटाला समजत नाही, हे सगळ्यात मोठे दुर्दैव !

### सुषमा अंधारे यांच्या कोलांटउड्या..

उद्धव यांच्या शिवसेनेत जाण्यापूर्वी नाही म्हणायला अगदी मनापासून सुषमा यांना त्यावेळेच्या एकसंघ राष्ट्रवादीत जायचे होते. पण, सुषमा यांच्या प्रवेशाला विरोध करत थेट शरद पवारांना घेऊ नका, असे सांगितले गेले. ज्यात स्वतः अजित पवार होते! आज राजकीय परिस्थिती एवढी अचानक बदलली आहे, की आता त्याच अजितदादांना सुषमा आपल्या राष्ट्रवादीत हव्या आहेत, त्या दोघांचे त्याद्दष्टीने बोलणे व भेटीगाठी सुरु आहेत.

### अंधारे यांच्या पाठोपाठ चतुर्वेदी ?

कोणत्याही क्षणी अंधारे यांचे पक्षांतर आणि राष्ट्रवादी पक्ष प्रवेश हे नक्की झालेले आहे. आधी सुषमा अंधारे आणि नंतर प्रियांका चतुर्वेदी की दोघी एकमेकांचे हात धरून एकाचवेळी दादांकडे धावतात.. बघू या नेमक्या राजकीय हालचाली आणि घडामोडी कोणत्या दिशेने वाटचाल करणार आहेत !

### 'शोले' चा शेवट बदलणार..

ज्या पद्धतीने उबाठा गटाला गळती सुरू झाली आहे, त्यावरून ठाकूर यांच्यावतीने सूड घेण्यासाठी कोणीच उरलेले नाही, हे निश्चित ! राजकारणात तिकडे 'महायुती' अतिशय बलशाली होत चालली आहे आणि ज्या जय-वीरू चा म्हणजेच नाना पटोले आणि शरद पवार यांचा आधार उबाठा गटने घेतला होता, त्यांचे पक्षी रसातळाला चालले आहेत.. ठाकूर यांच्या वतीने ते कधी सूड घेणार? 'शोले' तील या सूड नाट्याचा शेवट ठाकूर एकाकी पडण्यातच होणार आहे, सांगायला कोणा ज्योतिषाची मुळीच गरज नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मोरे यांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर

## शिवसेना ठाकरे गटाला शिंदे गटाकडून मोठा धक्का



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दापोली नगरपंचायतीमध्ये विद्यमान नगराध्यक्षांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला आहे. यामुळे दापोली नगरपंचायतीवरची शिवसेना ठाकरे गटाची सत्ता संपुष्टात आली आहे. नगरपंचायतीमध्ये १६ विरूध्द १ अशा मतांनी या अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला आहे. दापोली नगरपंचायतीच्या शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या विद्यमान नगराध्यक्षा ममता मोरे यांना त्याच्या पदावरून पायउतार करण्यासाठी सत्ताधारीपक्षाच्या नगरसेवकांनी नुकतीच जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली होती. व त्यांना दापोली नगरपंचायतीच्या विद्यमान नगराध्यक्षा ममता मोरे यांच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करणारे पत्र दिले होते.**

त्यानुसार ममता मोरे यांच्या विरोधात एक पत्र २५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे सादर करण्यात आले. त्यानुसार २ मे व ५ मे रोजी या ठरावावर चर्चा करण्यासाठी नगरसेवकांची बैठक लावली. ही सभा घेण्यासाठी दापोलीचे उपविभागीय अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले. दि. ५ मे रोजी सकाळी ११ वाजता दापोली नगरपंचायतीच्या सभागृहामध्ये उपविभागीय अधिकारी विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीला सुरूवात झाली.यात नगराध्यक्ष यांच्या विरोधात मांडलेल्या अविश्वास ठरावाच्या बाजूने १४ राष्ट्रवादीच्या नगरसेवक साधना बोत्रे, भाजपाच्या जया साळवी यांनी मतदान केले. तर ठरावाच्या विरोधात ममता मोरे यांनी मतदान केले. त्यानंतर प्राधिकृत अधिकारी यांनी नगराध्यक्ष यांच्याविरोधात अविश्वास ठराव १६ विरूध्द १ मतांनी पारित झाल्याचे जाहीर केले. यानंतर पत्रकारांशी बोलताना ममता मोरे यांनी या अविश्वास ठरावाच्या प्रक्रियेविरोधात आपण मुंबई उच्च न्यायालयात याचिका जाहीर केली असून तेथे न्याय मिळेल. हा अविश्वास ठराव हा माझ्यावरील नसून दापोलीकर जनतेवरील असल्याचे सांगितले. दापोली नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक २०२२ मध्ये पार पडली होती. या निवडणुकीत तत्कालीन शिवसेना व राष्ट्रवादी यांनी एकत्र येत तत्कालीन विद्यमान आमदार योगेश कदम यांच्याकडून शिवसेनेची सूत्रे काढून घेत ती सुत्रे शिवसेनेचे माजी आमदार सूर्यकांत दळवी यांच्याकडे देण्यात आली होती. या निवडणुकीत शिवसेनेचे माजी आमदार सूर्यकांत दळवी व राष्ट्रवादीचे माजी आमदार संजय कदम यांनी एकत्रित निवडणूक लढवत शिवसेनेचे ६ व राष्ट्रवादीचे ८ असे १४ नगरसेवक निवडून आणले होते.तर २ नगरसेवक योगेश कदम यांचे समर्थक तर १ नगरसेवक भाजपाचा निवडून आला होता. त्यानंतर राज्यात बदललेल्या परिस्थितीमुळे राष्ट्रवादीचे ८ पैकी ७ नगरसेवक व शिवसेनेचे ६ असे १३ नगरसेवक ठाकरे गटामध्ये सामील झाले होते. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदार योगेश कदम यांनी बाजी मारल्यानंतर पहिल्यांदा ५ व नंतर ७ नगरसेवकांनी अशा १२ नगरसेवकांनी ठाकरे गटामधून शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता.तसेच राष्ट्रवादीच्या नगरसेविका साधना बोत्रे यांनी या गटासोबत न जाता आपल्याच पक्षात राहणे पसंत केले. त्यामुळे शिवसेनेकडे १४, भाजप १, राष्ट्रवादी १ असे संख्याबळ झाले होते. त्यामुळे नगराध्यक्षांवर अविश्वास ठराव येणे ते क्रमप्राप्त होते. आता नगराध्यक्ष निवडणूकीचा कार्यक्रम कधी जाहीर होतो व पुढचा नगराध्यक्ष कोण होतो. त्यानुसार ममता मोरे यांच्या विरोधात एक पत्र २५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे सादर करण्यात आले. त्यानुसार २ मे व ५ मे रोजी या ठरावावर चर्चा करण्यासाठी नगरसेवकांची बैठक लावली. ही सभा घेण्यासाठी दापोलीचे उपविभागीय अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले.

### मोरे यांच्या कारभाराबाबत नाराजी

दापोली नगरपंचायतीच्या सभागृहामध्ये उपविभागीय अधिकारी विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीला सुरूवात झाली. यात नगराध्यक्ष यांच्या विरोधात मांडलेल्या अविश्वास ठरावाच्या बाजूने १४ राष्ट्रवादीच्या नगरसेवक साधना बोत्रे, भाजपाच्या जया साळवी यांनी मतदान केले. तर ठरावाच्या विरोधात ममता मोरे यांनी मतदान केले. त्यानंतर प्राधिकृत अधिकारी यांनी नगराध्यक्ष यांच्याविरोधात अविश्वास ठराव १६ विरूध्द १ मतांनी पारित झाल्याचे जाहीर केले. यानंतर पत्रकारांशी बोलताना ममता मोरे यांनी या अविश्वास ठरावाच्या प्रक्रियेविरोधात आपण मुंबई उच्च न्यायालयात याचिका जाहीर केली असून तेथे न्याय मिळेल.

# भाजप समाजात जातीय विष कालवत आहे!

## सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली संविधान बचाओ पदयात्रा



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**काँग्रेस पक्षाच्या सद्भावना पदयात्रेच्या दुसऱ्या दिवशी राज्यभरातील महत्त्वाच्या काँग्रेस नेत्यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्ला चढवत भारतीय जनता पक्ष देशात व राज्यात जातीय आणि धर्मांधतेचे विष कालवत असल्याची टीका केली. जात जनगणनेच्या मुद्द्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माघार घ्यावी लागली आणि राहुल गांधी यांच्या मताप्रमाणे निर्णय घ्यावा लागला असेही यावेळी बहुतांश वक्त्यांनी नमूद केले.**

महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवारी (दि.५) शहर काँग्रेस कार्यालयापासून संविधान बचाओ पदयात्रा काढण्यात आली. या यात्रेची सांगता अक्षता मंगल कार्यालयात संविधान संमेलनाने झाली. विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, खा. प्रणिती शिंदे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, यु. बी. व्यंकटेश, खा. डॉ. कल्याण काळे, खा. रविंद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी चेन्नीथला म्हणाले की, सोमनाथ सुर्यवंशी व विजय वाकोडे यांच्यावर झालेल्या अन्यायाप्रश्नी राहुल गांधी यांनी आवाज उठवला, या घटनेला तीन महिने झाले तरी तरी अद्याप सुर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांवर सरकारने कोणतीच कारवाई केलेली नाही, मुख्यमंत्री यावर काही बोलत नाहीत. राहुल गांधी यांनी सामाजिक न्यायासाठी जातीजनगणनेचा मुद्दा उपस्थित केला, याचा फायदा मागास, वंचित, पीडित लोकांना होईल. जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला पण तो कधी होईल हे जाहीर करत नाहीत.

### तर मराठा आरक्षण मार्गी लागेल

सपकाळ यांनी जातनिहाय जनगणना झाली तर मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेल. ओबीसीला २७ टक्के आरक्षण आहे ते सुद्धा वाढू शकते. भाजप मात्र जाती जातीत भांडणे लावत आहे अशावेळी बहुजन समाज एकत्र असणे ही काळाची गरज आहे. राज्यात रोज ६ शेतकरी आत्महत्या होत आहेत, सरकारला मात्र शेतकऱ्यांचे प्रश्न सोडून अदानी अंबानींचे हित महत्वाचे वाटत आहे. गरज नसताना ८८ हजार कोटींचा शक्तीपीठ महामार्ग निर्माण करण्यात सरकार प्राधान्य देत आहे असा आरोपही यावेळी सपकाळ यांनी केला. विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले की, भाजप २०१४ पासून देशात व राज्यात जातीयतेचे व धर्मांधतेचे विष पेरत आहे. भाजपला दुसऱ्याची घरे फोडण्याची सवय लागली आहे. आमची वेळ आल्यावर याचा बदला घेऊ. काही लोक पक्ष सोडून जात आहेत पण दुसऱ्याच्या मागे चालण्यापेक्षा स्वतःचा रस्ता स्वतः तयार करा, असे वडेट्टीवार म्हणाले.

# हल्ल्यानंतर दिल्लीत हालचालींना वेग

## विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले. या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत पाकिस्तानची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. या बरोबरच पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवरही भारताने पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय घेतला. पहलगाममधील हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढल्याचं चित्र निर्माण झालं आहे.**



भारत कधीही लष्करी कारवाई करू शकतो, या भितीने पाकिस्तानची चलबिचल वाढल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर दिल्लीत बैठकांवर बैठका घेत आहे. भारताच्या हवाई दल प्रमुखांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर भारताच्या नौदल प्रमुखांनी देखील पंतप्रधानांची भेट घेत पहलगाम हल्ल्याच्या संदर्भात चर्चा केल्याचं बोललं जात आहे. असं असतानाच आज काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अचानक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या भेटीत राहुल गांधी आणि पंतप्रधान मोदी यांच्यात नेमकं कोणत्या विषयांवर चर्चा झाली? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहे.पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर दिल्लीत हालचालींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे.

आज राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. एकीकडे भारत-पाकिस्तान तणावाची परिस्थिती असताना ही भेट घेतल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. मात्र, सीबीआय प्रमुख प्रवीण सूद यांचा कार्यकाळ संपत असल्यामुळे सीबीआयच्या प्रमुखपदी निवड करण्यासंदर्भात या भेटीत चर्चा झाल्याचं बोललं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.केंद्रीय अन्वेषण विभागाचे (सीबीआय) प्रमुख प्रवीण सूद यांना एक वर्षाची मुदतवाढ मिळण्याची शक्यता असल्याचं इंडियन एक्स्प्रेसने वृत्तात म्हटलं आहे. प्रवीण सूद यांचा कार्यकाळ संपल्यानंतर पुढील सीबीआय प्रमुख निवडण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीला भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे देखील उपस्थित होते.सूत्रांच्या माहितीनुसार पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेल्या तीन सदस्यीय निवड समितीने काही वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या नावांवर चर्चा केली. मात्र, सुचवण्यात आलेल्या उमेदवारांपैकी कोणत्याही एका नावावर एकमत होऊ शकलेलं नाही. त्यामुळे या तीन सदस्यीय निवड समितीने प्रवीण सूद यांचा कार्यकाळ एक वर्ष वाढवण्यास सहमती दर्शवल्याचं चर्चा आहे.भारत कधीही लष्करी कारवाई करू शकतो, या भितीने पाकिस्तानची चलबिचल वाढल्याचं पाहायला मिळत आहे. यातच भारत सरकार पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर दिल्लीत बैठकांवर बैठका घेत आहे. भारताच्या हवाई दल प्रमुखांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्यानंतर भारताच्या नौदल प्रमुखांनी देखील पंतप्रधानांची भेट घेत पहलगाम हल्ल्याच्या संदर्भात चर्चा केल्याचं बोललं जात आहे.

### दिल्लीत हालचालींना वेग

असं असतानाच आज काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अचानक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या भेटीत राहुल गांधी आणि पंतप्रधान मोदी यांच्यात नेमकं कोणत्या विषयांवर चर्चा झाली? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहे.पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर दिल्लीत हालचालींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. आज राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. एकीकडे भारत-पाकिस्तान तणावाची परिस्थिती असताना ही भेट घेतल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# राजस्थानमध्ये पाकिस्तानी रेंजरला अटक!

## भारत-पाकिस्तान सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न उधळला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव वाढल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत कठोर पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, असं असतानाच दोन दिवसांपूर्वी पंजाब पोलिसांनी दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक करत मोठी कारवाई केली आहे.**



यानंतर आता पंजाब सीमेवरून एका व्यक्तीने भारतात प्रवेश करत घुसखोरीचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. या घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकाला अटक करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. यावेळी या व्यक्तीकडून पाकिस्तानी चलन आणि ओळखपत्र जप्त करण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.भारत-पाकिस्तान सीमेवर घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या नागरिकाला पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यात सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) अटक केली असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिल्याचं वृत्तात म्हटलं आहे. मोहम्मद हुसेन असं या व्यक्तीचं नाव असून त्याला पंजाब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलं आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ही अटक करण्यात आली आहे.काही दिवसांपूर्वी राजस्थानमध्ये एका पाकिस्तानी रेंजरला भारतीय हद्दीत घुसण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. प्राथमिक तपासात असं दिसून आलं की हा रेंजर हेरगिरी किंवा गुप्तहेर हेतूने घुसला असावा.

### पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक

पंजाबमधील आंतरराष्ट्रीय सीमेवर चुकून पाकिस्तानी हद्दीत घुसल्यानंतर पाकिस्तानी सैन्याने बीएसएफ जवान पूर्णम कुमार शॉला ताब्यात घेतल्यानंतर काही दिवसांतच एका पाकिस्तानी रेंजरला आणि एका पाकिस्तानी नागरिकाला घुसखोरीच्या प्रयत्नात असताना अटक करण्यात आली आहे.दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना पंजाब पोलिसांनी नुकतीच अटक केली आहे. अमृतसर ग्रामीण पोलिसांनी शनिवारी अमृतसरमधील लष्करी छावणी क्षेत्र आणि हवाई तळांची संवेदनशील माहिती आणि छायाचित्रे लीक करण्याच्या आरोपाखाली दोन जणांना अटक केली आहे. या आरोपींची ओळख पटली असून शेर मसीह आणि सूरज मसीह अशी त्यांचे नावे असल्याचं सांगितलं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं होतं. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत कठोर पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे.

# लीलाला माफ करा, अंतराला काढून टाका

'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका लोकांची आवडती मालिका आहे. आता ही मालिका लवकरच प्रेक्षकांचा निरोप घेत असल्याचे समोर आले आहे, त्यामुळे प्रेक्षक सोशल मीडियावर नाराजीदेखील व्यक्त करताना दिसत आहेत. 'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका संपवू नका असा सोशल मीडियावर ट्रेंडदेखील पाहायला मिळत होता. मालिकेतील सर्वच पात्रे त्यांच्या वेगळेपणामुळे प्रेक्षकांची लाडकी आहेत. सध्या मालिकेत एजे व लीलाच्या आयुष्यात नवीन संकट आल्याचे पाहायला मिळत आहे. एजेची पहिली पत्नी अंतरा त्यांच्या आयुष्यात परतली आहे.एका अपघातात एजेच्या पहिल्या पत्नीचा म्हणजेच अंतराचा मृत्यू झाला, असा सर्वांचा समज होता. त्यानंतर एजेच्या आईने त्याचे दुसरे लग्न लावले. लीला त्याच्या दुसऱ्या पत्नीच्या रुपात त्याच्या आयुष्यात आली. सुरुवातीला त्या दोघांमध्ये मोठे गैरसमज होते. त्यांचे स्वभावदेखील परस्पर विरुद्ध असल्याचे पाहायला मिळत होते. मात्र, त्यांच्यात मैत्री झाली आणि ते एकमेकांच्या प्रेमातही पडले.काही दिवसांपूर्वीच अंतरा एका आश्रमात राहात असल्याचे आजीला समजले. अंतराला पाहून आजींना धक्का बसला. पण, एजे व लीला यांच्या संसारात कोणतेही संकट येऊ नये, यासाठी त्यांनी अंतराला घरी न नेण्याचा निर्णय घेतला. मात्र, आजी काहीतरी लपवत असल्याचा संशय लीला व एजेला आला. त्यानंतर लीलाने आजीचा पाठलाग केला. त्यावेळी तिला अंतरा जिवंत असल्याचे समजले. पण, अंतराला अपघातामुळे तिच्या भूतकाळातील काहीही आठवत नाही. त्यानंतर लीलाने अंतराला घरी आणण्याचा निर्णय घेतला. अंतराला पाहून एजे तसेच घरातील इतरांना धक्का बसल्याचे पाहायला मिळत आहे.आता या मालिकेत दुर्गाच्या भूमिकेत दिसणाऱ्या अभिनेत्री शर्मिला शिंदेने नुकताच आस्क मी एनिथिंग हे सेशन घेतले. यामध्ये चाहत्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अभिनेत्रीने उत्तरे दिली आहेत. एका चाहत्याने म्हटले की, तुम्ही लीलाला माफ करा आणि अंतराला सीनमधून काढून टाका. यावर उत्तर देताना शर्मिलाने लिहिले, "त्या गरीब अंतराच्या जागी स्वत:ला ठेऊन बघा. तिचे कुटुंब नाही, तिची स्मरणशक्ती गेली आहे. वर्षानुवर्षे ती आश्रमात राहिली आहे. ज्या नवऱ्यावर ती खूप प्रेम करायची, त्याने दुसऱ्या मुलीशी लग्न केले आहे.



# शिवालीच्या बहिणीला पाहिलंत का?

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमामुळे अनेक नवोदित कलाकार घराघरांत लोकप्रिय झाले. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर हा विनोदी कार्यक्रम संपूर्ण जगभरात पाहिला जातो. हास्यजत्रेमुळे निखिल बने, वनिता खरात, गौरव मोरे, ओंकार राऊत, ईशा डे, प्रियदर्शिनी इंदलकर या कलाकारांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात वाढला. हास्यजत्रेमुळे आणखी एक अभिनेत्री सर्वत्र चर्चेत आली ती म्हणजे प्रेक्षकांची लाडकी शिवाली परब. नाटक, विविध गाण्यांचे अल्बम, सिनेमे यामुळे घराघरांत ती लोकप्रिय झाली. आता शिवालीला सर्वत्र कल्याणची चुलबुली म्हणून ओळखलं जातं. मात्र, तुम्हाला माहितीये का? तिला सख्खी बहीण सुद्धा आहे.शिवालीच्या बहिणीचं नाव स्नेहा परब आहे. शिवालीची बहीण देखील दिसायला खूपच सुंदर आहे. स्नेहा देखील आपल्या बहिणीप्रमाणे बोल्ड अन् बिनधास्त आहे. या दोघी बहिणी सोशल मीडियावर कायम सक्रिय असतात. या दोघींमध्ये खूप चांगलं बॉण्डिंग आहे. स्नेहा मॉडेल आणि सोशल मीडिया स्टार म्हणून ओळखळी जाते. मात्र, आता तिने इंडस्ट्रीत सुद्धा पदार्पण केलं आहे.

# सिक्वेल न येण्यामागे आमिर कारणीभूत

बॉलीवूडचे काही जुने चित्रपट वर्षानुवर्षे प्रेक्षकांच्या मनावर आजही राज्य करतात. असाच एक चित्रपट म्हणजे जिनिलीया डिसूजा-देशमुख आणि इम्रान खान यांचा 'जाने तू या जाने ना'. इम्रान खानने 'जाने तू या जाने ना' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. त्याचा हा चित्रपट प्रचंड गाजला होता. २००८ साली प्रदर्शित झालेल्या 'जाने तु या जाने ना' या चित्रपटाचा स्वतःचा एक चाहतावर्ग आहे. आजही हा चित्रपट पाहणारे असंख्य चाहते आहेत. पण तुम्हाला माहिती आहे का? या चित्रपटाचा दुसरा भागही येणार होता. 'जाने तु या जाने ना' या चित्रपटच्या दुसऱ्या भागातून जिनिलीया आणि इम्रान ही जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करणार होती. पण अभिनेता आमिर खानमुळे या चित्रपटाचा दुसरा भाग येऊ शकला नाही. हा चित्रपट अब्बास टायरवाला यांनी दिग्दर्शित केला होता. या चित्रपटाचा दुसरा भागाबद्दल त्यांनी एका मुलाखतीत सांगितले की, चित्रपटाच्या सिक्वेलसाठी त्यांनी आमिर खानशी संपर्क साधला होता. पण आमिर खानने चित्रपटाचा सिक्वेल करण्यास नकार दिला.याबद्दल दिग्दर्शक अब्बास टायरवाला म्हणाले की, "माझ्या इंस्टाग्रामवर रोज 'जाने तु या जाने ना' सिक्वेलबद्दल मॅसेज येत असतात. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर काही दिवसांनी मी चित्रपटाचा सिक्वेलसाठी आमिरकडे गेलो होतो.



# अवनीत कौरच्या फॉलोअर्समध्ये लाखोंनी वाढ

स्टार क्रिकेटर विराट कोहली नेहमी कुठल्या नं कुठल्या कारणाने चर्चेत असतो. कधी क्रिकेटमधील त्याच्या खेळामुळे तर कधी वैयक्तिक आयुष्यामुळे. विराट कोहली हा अनेकांचा आवडता क्रिकेटर आहे, त्यामुळे विराटचा चाहतावर्गही बराच मोठा आहे, म्हणून विराटबद्दलच्या कुठल्याही बातमीची मोठ्या प्रमाणात चर्चा होत असते. अशातच आता सध्या सोशल मीडियावर एका गोष्टीची बरीच चर्चा झाली. विराटने इन्स्टाग्रामवर अवनीत कौरच्या फॅन पेजने शेअर केलेला तिचा एक फोटो लाईक केल्याने या चर्चेला उधाण आलं. १ मे रोजी विराटने त्याची बायको अभिनेत्री अनुष्का शर्माला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत एक पोस्ट शेअर केली होती.

यावेळी त्याने इन्स्टा फिड क्लीअर करताना चुकून अवनीत कौरचा फोटो लाईक केला. परंतु, यानंतर सोशल मीडियावर मात्र सर्वत्र याचीच चर्चा होताना दिसली. यानंतर विराटने त्याच्या इन्स्टा स्टोरीमधून याबाबत भाष्य करत ही पोस्ट चुकून लाईक झाली असून यामागे कुठलाही उद्देश नसल्याचं म्हटलं होतं.परंतु, विराट ही स्टोरी पोस्ट करेपर्यंत सोशल मीडियावर याबद्दलचे अनेक मीमस् व रील व्हायरल झाले होते. महत्त्वाचं म्हणजे विराटने अवनीत कौरच्या फॅन पेजने शेअर केलेला फोटो लाईक केल्यानंतर तिच्या फॉलोअर्समध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं आढळलं; तर यामुळे सलग ४८ तास अवनीत स्पॉटलाईटमध्ये होती. अशातच आता विराटने अवनीतचा फोटो चुकून लाईक केल्याचा तिला मात्र फायदा झाल्याचं पाहायला मिळतं.काही वृत्तांनुसार विराटच्या एका लाईकमुळे अवनीतच्या फॉलोअर्समध्ये तर वाढ झालीच, परंतु यामुळे तिला ब्युटी, फॅशनसंबंधित १२ नवीन जाहिराती मिळाल्या, तर पूर्वी अवनीतचे इन्स्टाग्रामवर ३० मिलियन इतके फॉलोअर्स होते, ज्यांच्यामध्ये आता वाढ झाली असून हा आकडा ३१.८ मिलियन इतका झाला आहे. त्यामुळे अवनीतच्या फॉलोअर्स लिस्टमध्ये अवघ्या काही दिवसांतच जवळपास १८ लाख फॉलोअर्सची वाढ झाली. काही दिवसांपूर्वी अवनीत व क्रिकेटर शुभमन गील यांचंही नाव जोडलं गेलं होतं. हे दोघे एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या.

# भारताचा जागतिक क्रिकेटमध्ये दबदबा!

## टी-20 मध्ये इंडिया नंबर वन,कसोटीत ऑस्ट्रेलिया पहिल्या स्थानी

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय क्रिकेट संघाचा व्हाईट बॉल फॉरमॅटमध्ये जगभरात डंका आहे. भारताने २०२४ मध्ये टी-२० आणि वनडेमध्ये चांगली कामगिरी करत आयसीसी रँकिंगमध्ये आपला दबदबा राखला आहे. आयसीसी म्हणजेच इंटरनॅशनल क्रिकेट काऊन्सिलने वर्षभरातील अपडेटनंतर आयसीसी रँकिंग जाहीर केली आहे. ज्यामध्ये भारतीय संघ वनडे आणि टी-२० मध्ये पहिल्या स्थानी आहे.**



रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली, टीम इंडियाने जून २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला आणि त्यानंतर मार्च २०२५ च्या सुरूवातीला भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. वार्षिक अपडेटनंतर, आयसीसी एकदिवसीय संघ क्रमवारीत भारताचे १२४ रेटिंग गुण झाले आहेत. पूर्वी ते १२२ रेटिंग पॉइंट्स होते, त्यामुळे भारताला दोन पॉइंट्सचा फायदा झाला आहे. त्यानंतर, चॅम्पियन्स ट्रॉफीचा उपविजेता संघ न्यूझीलंड दुसऱ्या स्थानी आहे. त्यांनी विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले.ऑस्ट्रेलिया वनडे रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरली आहे. वार्षिक अपडेटनंतर आयसीसी रँकिंगमध्ये श्रीलंकेला चांगलाच फायदा झाला आहे. गेल्या काही महिन्यांत, घरच्या मैदानावर भारत आणि ऑस्ट्रेलियाला पराभूक केल्याने त्यांना खूप फायदा झाला आहे. संघ आता पाच रेटिंग गुणांच्या वाढीसह चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. त्यांनी पाकिस्तान (पाचवे) आणि दक्षिण आफ्रिका (सहावे) यांना मागे टाकले आहे. पाकिस्तानला एक रेटिंग पॉइंट जास्तीचा मिळाला आहे तर आफ्रिका संघाला चार गुण गमवावे लागले आहेत. उर्वरित संघ अफगाणिस्तान (सातवे) आणि इंग्लंड (आठवे) आहेत. अलिकडच्या अपयशामुळे इंग्लिश संघाची चांगलीच घसरण झाली. संघाला ४ गुणांचा तोटा झाला आहे. वेस्ट इंडिज (नवव्या) आणि बांगलादेश (दहाव्या) हे संघ टॉप-१० मध्ये आहेत.आयसीसी टी-२० रँकिंगमध्ये भारतीय संघ सर्वाधिक २७१ गुणांसह पहिल्या स्थानी आहे. तर दुसऱ्या स्थानी ऑस्ट्रेलियाचा संघ आहे. दोन्ही संघांमधील फरक ९ गुणांचा आहे. २०२२ टी-२० विश्वचषक विजेता इंग्लंड तिसऱ्या, न्यूझीलंड चौथ्या, वेस्ट इंडिज पाचव्या आणि दक्षिण आफ्रिका सहाव्या स्थानावर आहे. श्रीलंका सातव्या, पाकिस्तान आठव्या, बांगलादेश नवव्या आणि अफगाणिस्तान दहाव्या स्थानावर आहे. वार्षिक अपडेटनंतर आयसीसीने प्रथमच आयसीसी टी-२० क्रमवारीत १०० संघांना स्थान दिले आहे. २०१९ मध्ये जेव्हा जागतिक क्रमवारी पहिल्यांदा जाहीर झाली तेव्हा ८० संघ होतेबॉर्डर गावस्कर ट्रॉफी आणि न्यूझीलंडविरूद्धची कसोटी मालिका गमावल्याचा भारताला मोठा फटका बसला आहे. भारतीय संघ कसोटी क्रमवारीत चौथ्या स्थानी पोहोचला आहे. दुसऱ्या स्थावर इंग्लंडचा संघ आहे, तर तिसऱ्या स्थानी दक्षिण आफ्रिकेचा संघ आहे. इंग्लंडला दोन स्थानांचा फायदा झाला आहे. तर भारत आणि आफ्रिकेचे संघ एकेका स्थानाने खाली घसरले आहेत.रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली, टीम इंडियाने जून २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकला आणि त्यानंतर मार्च २०२५ च्या सुरूवातीला भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. वार्षिक अपडेटनंतर, आयसीसी एकदिवसीय संघ क्रमवारीत भारताचे १२४ रेटिंग गुण झाले आहेत. पूर्वी ते १२२ रेटिंग पॉइंट्स होते, त्यामुळे भारताला दोन पॉइंट्सचा फायदा झाला आहे. त्यानंतर, चॅम्पियन्स ट्रॉफीचा उपविजेता संघ न्यूझीलंड दुसऱ्या स्थानी आहे. त्यांनी विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले.ऑस्ट्रेलिया वनडे रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरली आहे. वार्षिक अपडेटनंतर आयसीसी रँकिंगमध्ये श्रीलंकेला चांगलाच फायदा झाला आहे.

### इंग्लंड तिसऱ्या स्थानावर आहे

भारत आणि ऑस्ट्रेलियाला पराभूक केल्याने त्यांना खूप फायदा झाला आहे. संघ आता पाच रेटिंग गुणांच्या वाढीसह चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. त्यांनी पाकिस्तान (पाचवे) आणि दक्षिण आफ्रिका (सहावे) यांना मागे टाकले आहे.पाकिस्तानला एक रेटिंग पॉइंट जास्तीचा मिळाला आहे तर आफ्रिका संघाला चार गुण गमवावे लागले आहेत. उर्वरित संघ अफगाणिस्तान (सातवे) आणि इंग्लंड (आठवे) आहेत. अलिकडच्या अपयशामुळे इंग्लिश संघाची चांगलीच घसरण झाली. संघाला ४ गुणांचा तोटा झाला आहे. वेस्ट इंडिज (नवव्या) आणि बांगलादेश (दहाव्या) हे संघ टॉप-१० मध्ये आहेत. आयसीसी टी-२० रँकिंगमध्ये भारतीय संघ सर्वाधिक २७१ गुणांसह पहिल्या स्थानी आहे. तर दुसऱ्या स्थानी ऑस्ट्रेलियाचा संघ आहे. दोन्ही संघांमधील फरक ९ गुणांचा आहे. २०२२ टी-२० विश्वचषक विजेता इंग्लंड तिसऱ्या, न्यूझीलंड चौथ्या, वेस्ट इंडिज पाचव्या आणि दक्षिण आफ्रिका सहाव्या स्थानावर आहे.

# बुमराहचं उपकर्णधारपद कायमचं गेलं?

## BCCI नव्या चेहऱ्याच्या शोधात, इंग्लंड दौऱ्याआधीच निर्णय होणार?

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**यंदाचं वर्ष भारताचा जलदगती गोलंदाज आणि भारताच्या भात्यातलं ब्रह्मास्त्र म्हणून ओळखला जाणारा जसप्रीत बुमराह याच्यासाठी काही फारसं चांगलं जाताना दिसत नाही. वर्षाच्या सुरुवातीलाच ऑस्ट्रेलिया दौऱ्यात बुमराहच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं एक कसोटी सामना जिंकला. त्याव्यतिरिक्त दोन कसोटी सामन्यातही त्यानं नेतृत्व केलं.**



पण तेव्हापासून बुमराहच्या सातत्याला घरघर लागली. भारतीय कसोटी संघाचा उपकर्णधार असणाऱ्या बुमराहला या वर्षी एकही कसोटी मालिका पूर्ण खेळता आलेली नाही. या पार्श्वभूमीवर बुमराहचं उपकर्णधारपद कायमचं जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.येत्या जून महिन्यात भारताचा कसोटी संघ रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. या मालिकेत पाच सामने खेळवले जाणार आहेत. पण वैयक्तिक कारणांमुळे बुमराहला या सर्व पाच सामन्यांत खेळता येणार नसल्याचं स्पष्ट झालंय. या पार्श्वभूमीवर आता निवड समितीकडून कसोटी उपकर्णधारपदासाठी नव्या नावाचा विचार केला जात असल्याचं इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तात म्हटलं आहे.आम्हाला असा खेळाडू हवाय, जो मालिकेतले सर्व पाचही सामने खेळू शकेल आणि उपकर्णधारपदासाठी योग्य असेल. बुमराह सर्व पाच कसोटी सामने खेळू शकणार नाहीये. आम्हाला वेगवेगळ्या सामन्यांसाठी वेगवेगळे उपकर्णधार नेमायचे नाहीयेत. कर्णधार व उपकर्णधार हे कायम असणं आणि त्यांनी मालिकेतील सर्व सामने खेळणं संघाच्या दृष्टीने योग्य ठरेल", असं बीसीसीआयमधील सूत्रांनी सांगितल्याचं या वृत्तात नमूद करण्यात आलं आहे. दरम्यान, कसोटी संघाच्या उपकर्णधारपदासाठी शुभमन गिल (२५) किंवा रिषभ पंत (२७) यांच्या नावाचा विचार निवड समिती करू शकते. निवड समितीला असा चेहरा या पदासाठी हवाय, ज्याला पुढे उपकर्णधार म्हणून तयार केलं जाऊ शकतं. सध्याच्या संघात गिल व पंत हे दोन खेळाडूच बीसीसीआयला बुमराहच्या दुखापतीचीदेखील चिंता असून त्याचा परिणाम त्याच्या करिअरवर होत असल्याचं दिसून येत आहे. या वर्षाच्या सुरुवातीला सिडनीमधील कसोटी सामन्यादरम्यान त्याला पाठिच्या दुखापतीचा सामना करावा लागला.

### बुमराहच्या दुखापतीची चिंता

त्यानंतर पुढचे तीन महिने बुमराह क्रिकेटपासून लांब राहिला. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही त्याला खेळता आलं नाही. शिवाय, आयपीएलचेही पहिले काही सामने त्याला खेळता आले नाहीत. याआधीही बुमराहच्या पाठिच्या दुखण्यामुळे संघनिवडीचा पेच निर्माण झाला आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार।
। दि. 6 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## चमकदार कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे कौतुक

# राजमाता जिजाऊ कॉलेजचे घवघवीत यश!

### शिक्षण विश्व: बारावी बोर्डाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचे नैपुण्य

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भोसरी लांडेवाडी येथील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी बारावी बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या चमकदार कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.**



बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात आला. यामध्ये महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २४-२५चा निकाल शाखा निहाय पुढीलप्रमाणे १२ वी कला शाखेचा निकाल ८९% १२ वी वाणिज्य ( मराठी माध्यम) शाखेचा निकाल ९०.८१% इ.१२ वी वाणिज्य (इंग्रजी माध्यम). ९६.३५% इ १२ वी विज्ञान शाखेचा निकाल १००% इतका लागला आहे.

परीक्षेत यश संपादन करणारे शाखानिहाय विद्यार्थी खालीलप्रमाणे: कला शाखा प्रथम क्रमांकाचे विद्यार्थी पूनम सावंत विश्वास ८२.३३%, सागर सुरेश ७७.६७%, शाही हरिकला ७५.५०%, वाणिज्य ( मराठी माध्यम) प्रथम क्रमांकाचे विद्यार्थी , फावडे अमृता ७७.८३ %, साळुंखे मनीषा ७६.३३ %, सोनवणे विजय ७३.३३%. वाणिज्य (इंग्रजी माध्यम) कुमारी राणे सिद्धी संतोष ८६.००%, गौंड रितू सुनील कुमार ८२.५०%, खेडकर तनिष्क मंगेश ८१.१७%, विज्ञान शाखा प्रथम तीन गुणवंत विद्यार्थी कुलकर्णी अथर्व विनायक ८३.६७%, जगदाळे शुभदा लालासाहेब ८१.००%, वाडेकर प्रज्ञेश ७७.६७%

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष , माजी आमदार विलास लांडे यांनी अभिनंदन केले व त्यांना भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. सचिव सुधीर मुंगसे , खजिनदार अजित गव्हाणे, विश्वस्त विक्रांत लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के. जी. कानडे,उपप्राचार्य प्रा किरण चौधरी, उपप्राचार्या डॉ नेहा बोरसे, रजिस्ट्रार अश्विनी चव्हाण , सर्व विभाग प्रमुख सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# एसबीपीआयएम मध्ये महिला सक्षमीकरण कार्यशाळा उत्साहात!

### सतर्क राहिलो तर स्वतःला व कुटुंबाला सायबर गुन्हेगारी पासून नक्की वाचवू शकतो

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**सायबर गुन्हेगार हे बहुतांश वेळा सुशिक्षित लोकांना, मध्यम वयातील व ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करतात. घरबसल्या ऑनलाईन पैसे कमवणे, बक्षीस देणे, मोफत कर्ज देणे असे आमिष दाखवून फसवितात. बँकेतून, सरकारी कार्यालयातून, विद्युत विभाग किंवा एमएनजीएल येथून बोलत आहे असे सांगून बोलण्यामध्ये गुंतवून लिंक क्लिक करायला सांगितले जाते.**






मोबाईलवर ओटीपी किंवा सायबर फ्रॉड करणाऱ्या लिंक पाठवून माहिती विचारली जाते ही माहिती किंवा आलेला ओटीपी त्यांना देऊ नये. कोणत्याही लिंक वर क्लिक करून बक्षिसाच्या आमिषाला बळी पडू नये. आपले आर्थिक व्यवहार अनोळखी व्यक्तीशी शेअर करू नये, नेहमी सतर्क रहावे. आपण सतर्क राहिलो तर स्वतःला व कुटुंबाला सायबर गुन्हेगारी पासून नक्की वाचवू शकतो असे पिंपरी पोलिस स्टेशनच्या सायबर विभाग पोलिस उपनिरीक्षक विद्या पाटील यांनी सांगितले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) येथे महिला सबलीकरण व सक्षमीकरण या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेत त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पिंपरी चिंचवड मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा डांगे, एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, डॉ. रुपाली कुदरे, विद्याथी विकास अधिकारी डॉ.काजल माहेश्वरी आदी उपस्थित होते. वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा डांगे यांनी सांगितले की, शारीरिक तसेच मानसिक आरोग्य वाढवण्यासाठी सर्वांनी जाणीवपूर्वक सकारात्मक प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येकाने रोज नियमितपणे व्यायाम, प्राणायाम केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तणाव मुक्तीसाठी वेळेचे व्यवस्थापन केले पाहिजे. सर्वांनी कुटुंबात संवाद साधून भावनिक वातावरण उत्तम राहील याची काळजी घेतली पाहिजे. नियमित व्यायाम, संतुलित आहार, शक्य असेल तेव्हा पर्यटन आणि सकारात्मक विचार याचा आपल्या जीवनशैलीत वापर केला तर यश नक्की मिळेल असे डॉ. डांगे यांनी सांगितले.

संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी स्वागत केले. डॉ. रुपाली कुदरे यांनी आभार मानले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
“यत् भावो – तत् भवति”
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> ‘C’ Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool




95277 64646 / 77967 67292

For more info